# अरब लोकशाही संघर्षाची किंमत

**चंद्रशेखर पुरंदरे**

ट्युनिशिया व इजिप्तमधील हुकूमशहा जानेवारी-फेब्रुवारीत पदच्युत झाले. *(आंदोलन-मार्च अंक).* लोकशाहीच्या मागणीचा झंझावात अरब जगतात तेव्हापासून अधिक जोमाने पसरला. पण इतरत्र इतक्या शांतपणे सत्तांतरे होतील असे दिसत नाही.

लिबियामध्ये सध्या यादवी चालू झाली आहे. तेथील सर्वेसर्वा मोहम्मद गडाफीने सत्ता सोडावी अशी मागणी देशभर विविध ठिकाणी सुरू झाली. हा विरोध हिंसेने चिरडून टाकण्याचा निर्धार गडाफीने व्यक्त केला आहे. त्याच्या मते लिबियाला पुन्हा वसाहत करण्याचा (लिबिया १९५१ पर्यंत इटालियन वसाहत होती) हा पश्चिमेचा डाव आहे आणि त्याबरोबरच लिबियात मूलतत्त्ववादी मुस्लिम राजवट आणण्याचे अल्-कईदाचे कारस्थान आहे. विरोधी आंदोलनाने सुरूवातीस तेलसंपन्न लिबियातील काही शहरे आपल्या नियंत्रणाखाली आणली. पण मार्चच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत सरकारी सैन्याने ही शहरे परत ताब्यात घेण्यास सुरूवात केली आहे. आधी पायदळ, रणगाडे विरोधकांविरुद्ध वापरले. आता तर विरोधकांच्या प्रदेशावर हवाई बॉम्बहल्ले सुरू करण्यात आले आहेत. गडाफीचे मुलगे (सातपैकी प्रामुख्याने दोन-तीन) या कारवाईचे सेनापती आहेत.

गडाफीविरुद्धचे आंदोलन उत्स्फूर्तपणे चालू झाले. त्याला निश्चित नेतृत्व, दिशा नाही. सरकारी लष्कराच्या मानाने शस्त्रेही तोकडी आहेत. गेली चाळीस वर्षे गडाफीने बंदुकीच्या जोरावर सत्ता शाबूत ठेवली आहे. मध्यंतरी बरीच वर्षे लिबिया आंतरराष्ट्रीय राजकारणातील अस्पृश्य देश होता. जगभर आतंकवादाला खतपाणी घालणे, अण्वस्त्रे बनवण्याचा कार्यक्रम राबवणे वगैरे संशयावरून पश्चिमेने व्यापारी निर्बंध (मुख्यत: तेलनिर्यात) लादले होते. हे निर्बंध तीन-चार वर्षांपूर्वी सैल करण्यात आले. पण ते कधीही परत घातले जातील ही शक्यता गडाफीने लक्षात घेतली. त्याची वैयक्तिक मालमत्ता आहेच पण अलिकडे त्याने कित्येक बिलियन डॉलर्स रोख रकमेत लिबियातच ठेवले आहेत. या पैशाच्या जोरावर राजकीय पाठिंबा विकत घेणे, लिबियन लष्कर पोसणे व आफ्रिकेतील इतर देशांतून भाडोत्री मारेकरी आणणे आणखी काही काळ तरी त्याला शक्य आहे. तसेच लिबियातील विविध टोळ्यांच्या अंतर्गत वैमनस्याचा फायदा घेण्यात तो वाकबगार आहे. या टोळ्यांमधील स्त्रिया व मुले ओलिस ठेवण्याचे प्रकार सुरू झाल्याच्या बातम्या आहेत. शिवाय, संपूर्ण कारकीर्दीत आपल्याला पर्यायी कोणतीच संस्था राष्ट्रीय स्तरावर उभी राहणार नाही याची त्याने खबरदारी घेतली आहे. एरवीही हुकूमशाहीत लोकसभेसारख्या निर्वाचित किंवा प्रसारमाध्यमे, न्यायालये यांच्यासारख्या अनिर्वाचित संस्था नाममात्रच असतात. पण लष्कर बळकट केले तर तेथूनही आपल्याविरुद्ध उठाव होऊ शकेल म्हणून त्याने लष्करही कमकुवत ठेवले आहे. पाकिस्तान किंवा इजिप्तमध्ये लष्कर ही जशी निर्वाचित सरकारला पर्यायी संस्था आहे, तशी लिबियात नाही. त्यामुळे इजिप्तमध्ये लष्कर जसे अध्यक्ष मुबारक व जनता यांच्या संघर्षात अलिप्त राहिले, तसे लिबियात झालेले नाही. तरीही, मर्यादित प्रमाणात काही ठिकाणी लष्कराच्या काही तुकड्यांनी आपल्याच देशाच्या नागरिकांवर हल्ला करण्यास नकार तरी दिला किंवा या तुकड्या विरोधकांना सामील तरी झाल्या. या अंतर्गत बंडखोरीवर प्रत्युत्तर म्हणून वर म्हटल्याप्रमाणे गडाफीने माली, नायजर या आफ्रिकेतील इतर देशांतून भाडोत्री मारेकरी आणले आहेत. त्यांचे लिबियाशी काहीच ऋणानुबंध नाहीत. त्यामुळे सुपारी घेऊन त्यांनी हिंसाचार सुरू केला आहे.

याचे दुहेरी परिणाम होत आहेत. एकतर हकनाक बळी पडणाऱ्या नागरिकांची संख्या वाढते आहे. एव्हाना किती हजार लोक मारले गेले असतील, याचा अंदाजही कठीण आहे. दुसरा अनपेक्षित परिणाम लिबियात उपजीविकेसाठी आलेल्या कृष्णवर्णीय आफ्रिकनांवर होत आहे.

गडाफीने आयात केलेले भाडोत्री मारेकरी कृष्णवर्णीय आफ्रिकन आहेत. लिबियन अरब उजळ वर्णाचे असतात. तेलाच्या निर्यातीमुळे इतर आफ्रिकन देशांच्या मानाने लिबिया संपन्न आहे. त्यामुळे घाना, नायजेरिया या गरीब आफ्रिकन देशातून कित्येक लाख मजूर लिबियात आले आहेत. त्यातील बहुतेक बेकायदेशीररीत्या आले आहेत. त्यामुळे त्यांना कागदोपत्री अस्तित्वच नाही. मजुरांचा असा व्यापार करणाऱ्या स्मलगर्सच्या टोळ्या या प्रदेशात पूर्वापार सक्रिय आहेत. 'लिबियात काम देतो' या आश्वासनावर या मुळात गरीब असणाऱ्या लोकांकडून या टोळ्या भरपूर पैसे घेतात. ऐपत नसल्याने हे पैसे हे गरजू लोक राक्षसी व्याजाने सावकारांकडून घेतात आणि लिबियात मोलमजुरी करून कर्जफेडीचा व घरी पैसे पाठवण्याचा प्रयत्न करतात. देशात अशांतता सुरू झाल्यावर या लोकांनी पळ काढण्यास सुरूवात केली. मात्र, देशाचा जो भाग गडाफीच्या नियंत्रणाखाली आहे तेथे आता सगळ्याच महामार्गांवर

लष्करी तपासणी सुरू झाली आहे. या लोकांना काहीच किंमत नाही किंवा त्यांना वालीही नाही हे लष्कराला ठाऊक आहे. त्यामुळे त्यांच्या प्रवासात या चेकनाक्यांवर त्यांना संपूर्ण लुबाडण्यात येते. रोख रक्कम, जी काही चीजवस्तू असेल, ती हडप केली जाते. विशेषत: मोबाईल फोनची कार्डे काढून घेण्यात येतात. त्यामुळे हे लोक घरी किंवा उर्वरित जगाशी संपर्क साधू शकत नाहीत. मग अक्षरश: अंगावरच्या वस्त्रानिशी त्यांची वणवण चालू होते.

देशाचा जो भाग गडाफीविरोधी सशस्त्र सेनांखाली आहे, तेथे तर या विस्थापितांवर आणखीच गंभीर आपत्ती येते. ते कृष्णवर्णीय असल्याने ते गडाफीने आयात केलेले कृष्णवर्णीय भाडोत्री मारेकरी आहेत अशा समजुतीने त्यांच्यावर हिंसाचार होतो. म्हणजे, लष्कर पिंढारी असेल, तर हे विरोधक आदर्शवादाच्या नावाखाली हिंसा करतात. ती जास्त भयानक असते. यात किती बळी जात आहेत, किती कायमचे अपंग होत आहेत याचाही अंदाज नाही. पण एकूण विस्थापित मजूर १० ते १२ लाख असावेत. (लिबियाची एकूण लोकसंख्या ६५ लाख. १५ लाख विदेशी मजूर आहेत. इतर २-३ लाख प्रामुख्याने बांगलादेशी, फिलिपिनी असे आशियाई आहेत) त्यावरून या विस्थापनाची व्याप्ती लक्षात यावी. राजधानी त्रिपोलीच्या विमानतळावर काही हजार आफ्रिकन मजुरांनी तळ ठोकला आहे. त्यांनी आधी विमानतळाच्या इमारतीत आश्रय घेण्याचा प्रयत्न केला पण सुरक्षादलाने त्यांना हुसकावून लावले. मग त्यांनी विमानतळाशेजारच्या मैदानावर बस्तान मांडले आहे. बाहेर रस्त्यावर गेल्यास, शहरात गेल्यास लष्कर किंवा गडाफीविरोधक यांच्यापासून जीवाला धोका आहे. त्यांच्याकडे रोख पैसा नाही. या वस्तीत अन्न नाही, पाणी नाही, रोगराई वाढत आहे आणि रोज भूकबळी, रोगांचे बळी पडत आहेत. कोणत्याच आंतरराष्ट्रीय सेवा संघटनेला तेथे शिरकाव नाही. ते ज्या देशांचे नागरिक आहेत, त्या देशांना त्यांच्या सुरक्षेची पर्वा नाही आणि लिबियन सरकार व सरकारचे विरोधक यांच्या तर ते खिजगणतीतही नाहीत. त्यातल्या त्यात नशीबवान कृष्णवर्णीय विस्थापित लिबियाची सीमा पार करून शेजारच्या ट्युनिशियात गेले आहेत. तेथील एका तात्पुरत्या मदत केंद्रात आजवर एक लाख लोक आहेत. आणखी तीस हजार लोकांसाठी असा कॅम्प उभारण्यासाठी दुबई पैसे देणार आहे.

महत्त्वाचा मुद्दा हा की उद्या अगदी जरी गडाफीचा पाडाव झाला आणि लिबियात लोकशाही आली तरी या लोकांनी मोजलेली किंमत कोणत्याच खात्यात जमा होत नाही. कारण मुळात हे लोक लोकशाही-हुकूमशाही या राष्ट्र-राज्याधिष्ठित संदर्भचौकटीच्या बाहेर आहेत. मुळे तुटलेल्या, तरंगत्या अशा विस्थापितांची संख्या अस्थिर अरब देशात प्रचंड प्रमाणात वाढत आहे.

ट्युनिशियात राजवट उलथून आता दोन-तीन महिने झाले पण अजून राजकीय व सामाजिक स्थैर्य नाही. त्यामुळे ट्युनिशियन आणि स्वत:चा देश सोडलेले लिबियन ट्युनिशियातून युरोपला स्थलांतरित होण्याचा प्रयत्न करत आहेत.

भौगोलिकदृष्ट्या दक्षिण इटलीतील एक दोन बेटे उत्तर ट्युनिशियाला जवळ आहेत. ती बेटे आता या निर्वासितांसाठी युरोपचे प्रवेशद्वार झाली आहेत. तेथेही मानवी वाहतूक स्मगलर्सच्या हातात आहे. ते या अगतिक लोकांकडून मजबूत पैसा वसूल करतात. सागरी वाहतुकीला अगदी अयोग्य अशा उघड्या तराफ्यांवर अनेक लोकांना कोंबण्यात येते. प्रवासात वाईट हवामान, रोगराई, तराफे उलटणे, धडकणे अशा अपघातांमुळे कित्येकजण मरतातही. तरीही लोक हा धोका पत्करतात. यावरून त्या-त्या देशातील भयानक परिस्थिती लक्षात यावी.

इटालियन सरकारच्या अलिकडच्या अंदाजानुसार पुढच्या दोन-तीन महिन्यात सुमारे चार लाख लिबियन इटलीत येतील. त्यातले दोन लाख एव्हाना लिबियातून बाहेर पडलेच आहेत. त्यानंतर आणखी सहा लाख येनकेन प्रकारेण देश सोडतील आणि इटलीमार्गे युरोपमध्ये प्रवेश करतील. स्थानिकांच्या भावना विदेशी लोकांविरुद्ध भडकवण्याचे जगभरचे (शिवसेनेसारखे) राजकारण यामागे असले आणि त्यामुळे हे आकडे अतिशयोक्त असले, तरी एकूण स्थलांतर दुर्लक्षिण्यासारखे नसणार. ट्युनिशियानंतर इजिप्तमध्ये हुकूमशाही संपुष्टात आली. तिथेही अजून संदिग्ध परिस्थिती आहे. 'मुबारक नको' इथपर्यंत सगळ्याच छटांच्या विरोधकांचे एकमत होते. पण तो गेल्यानंतर आता मुस्लिम-ख्रिश्चन संघर्ष वाढला आहे. मार्चच्या पहिल्याच आठवड्यात ख्रिश्चनांची कत्तल करण्यात आली. मूलतत्त्ववादी आणि प्रागतिक मुस्लिमांच्यातील संघर्षही वाढत आहेत. स्त्रीवादी, सरकारी कर्मचारी हे गट आपापले संकुचित कार्यक्रम पुढे रेटण्याचा प्रयत्न करत आहेत. पण इजिप्तमध्ये निदान अजून तरी लष्कर स्थैर्य देत आहे, विरोधकांशी संवाद करत आहे आणि खुल्या निवडणुकांचे वेळापत्रक पाळले जाईल असे म्हणत आहे.

मध्यपूर्वेत इतरत्र - विशेषत: येमेन व बहारिनमध्ये असाच राजवटींविरोधी असंतोष खदखदत आहे. इजिप्त व लिबिया काय मार्गाने जातील त्यावर तेथील हुकूमशाही राजवटी व त्यांचे विरोधक आपली दिशा ठरवतील असे दिसते. या सगळ्या उलाढालीत पश्चिम आणि उर्वरित जग यांना बहुश: प्रेक्षकाची भूमिका मिळाली आहे. नाही म्हणायला फ्रान्स आणि पोर्तुगालने लिबियाच्या गडाफी विरोधकांच्या गठबंधनाला लिबियाचे अधिकृत सरकार म्हणून मान्यता दिली आहे आणि हवाई हल्ल्यांद्वारे गडाफीने चालवलेला नरसंहार थांबवावा म्हणून अंतर्गत विमान-संचाराला बंदी घातली जाण्याची शक्यता आहे.

*(पान ११ वर)*

**जगभर** *(पान ९ वरून)*

या दोन गोष्टी सोडता (विरोधकांना मान्यता व हवाईबंदी) एकूण पश्चिम अतिसावध झालेली दिसते. अफगाणिस्तान-इराकमध्ये नको असताना प्रवेश करून आता पाय काढता येत नाही अशी परिस्थिती झाली आहे. तिसऱ्या मुस्लिम देशात हस्तक्षेप करायला आता अमेरिका-ब्रिटन धजावत नाही. दुसरे म्हणजे, त्यांची लष्करी क्षमताच तेवढी राहिलेली नाही.

रशिया-चीन-भारतासारख्या उर्वरित जगाला वेगळा सावधपणा बाळगावा लागतो. उद्या विरोधकांना चिरडून गडाफी सत्तेवर कायम राहिलाच तर त्याच्याच राजवटीशी व्यापारी संबंध चालू ठेवावे लागतील. त्यामुळे तेही त्याच्या विरोधी ठोस भूमिका देत नाहीत.

तत्त्वाधिष्ठित परराष्ट्रधोरणाच्या संकल्पनेचा पोकळपणा लिबियाच्या निमित्ताने अशा विविध अंगांनी उघड झाला आहे. लोकशाही संघर्षांबरोबरच या अनिर्णयाची किंमत अर्थातच सामान्य नागरिक देत आहे.

***चंद्रशेखर पुरंदरे***

*E-mail - artnondeco@yahoo.co.uk*
*Website - www.art-non-deco.com*